# राबोडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २०५ /२०२५ दि. 03 /०९/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, राबोडी** वाहतुक उपविभागाचे हद्दीत दि. ०८/०९/२०२५ रोजी **'ईद–ए–मिलाद'** सण साजरा होणार आहे. सदर वेळी मोठया प्रमाणात जनसमुदाय राबोडी हद्दीत जमा होत असतो. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **१)** के.व्हीला नाका, अक्सा मेडिकल मार्गे नुर मशीद रोडने आकाशगंगा राबोडीच्या दिशेने जाणाऱ्या तीन चाकी व चार चाकी व त्यावरिल असलेल्या वाहनांसाठी **के. व्हीला** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येते आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | **अ)** सदरची वाहने के.व्हीला नाका येथून सरळ मॉ. मिनाताई ठाकरे चौक रोडने जुने राबोडी पोलीस स्टेशन मार्गे इच्छीत स्थळी जातील.<br>**ब)** सदरची वाहने जीपीओ नाका येथून डावीकडे क्रिकनाका चौक कडुन डावीकडे वळुन राबोडी मार्गे इच्छीत स्थळी जातील. |

सदर वाहतूक अधिसूचना दिनांक ०८/०९/२०२५ रोजी दुपारी १२:०० वा. ते रात्रौ २२:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी** :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई/बृन्मुंबई महानगरपालिका
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.